The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109

A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal

Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत साहित्यातील विद्रोह

**डॉ. जितेंद्र शामसिंग गिरासे,**

श्रीमती एन.एन.सी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कुसुंबा ता.जि. धुळे

संत साहित्याने समाज प्रबोधनाचे व उद्बोधनाचे कार्य केले आहे हे सर्वश्रूत आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत चोखोबा, संत बसवेश्वर, संत चक्रधर स्वामी, संत रविदास यांनी जातीय विषमता, अस्पृश्यता नष्ट व्हावी,समाजात बंधुभाव, समता, स्वातंत्र्य, मानवता ही मूल्ये जपली जावीत यासाठी संतांनी विशेष अलौकिक कार्य केले आहे. आपल्या साहित्यातून त्यांनी विद्रोह व्यक्त केलेला आहे.

संत ज्ञानेश्वरांना वेदांचे प्रामाण्य मान्य होते. चातुर्वर्ण्य मान्य होते, अनेक देवांची पूजा करणे त्यांना अमान्य होते. वर्णभेद, जातिभेद नष्ट करा, तो समाज विघातक आहे, तो मानू नका. सर्व माणसे माणसांच्या लेखी समान माना असा उपदेश ज्ञानेश्वरांनी केलेला दिसतो. स्पृश्यास्पृश्यता पाळा असेही त्यांनी स्पष्ट शब्दात सांगितलेले नाही. यावरून ज्ञानेश्वरांची विचारसरणी पुरोगामी नव्हती, समाजाला धर्माच्या नावावर त्याच जुन्या मार्गावर चालत ठेवण्याचा प्रयत्न होता त्यामुळे स्त्री-शूद्रांच्या गुलामगिरीची बंधने आणखीनच दृढ झालेली दिसतात.

संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव यांच्या विचारात बराच फरक दिसून येतो. संत ज्ञानेश्वर सनातनी मताचे होते, तर संत नामदेव पुरोगामी वृत्तीचे होते संत ज्ञानेश्वर हे सनातन परंपरा आचरणारे होते तर संत नामदेव हे नवीन परंपरा निर्माण करणारे क्रान्तीकारक होते. संत ज्ञानेश्वरांनी मराठीत टीका करण्यासाठी चातुर्वर्ण्य व वर्ण विषमतेची समर्थक तर संत नामदेवाने चतुश्लोकी भागवत धर्मातील समता धर्म आचरण्यासाठी आम्हाला सापडे वर्म। करू भागवत धर्म, असा निर्धार केला होता आणि त्यासाठी 'पुंडलिके रचिली पेठ' या अभंगात प्रेम, समता, नाम, भाव ही भागवत धर्मीय चतु:सुत्री आचरेली दिसते. संत नामदेवांनी पुरोहितांच्या विरोधात आवाज उठविलेला दिसतो. संतांच्या कार्याविषयी आणि भूमिकेविषयी गौतम निकम यांनी आपले मत व्यक्त केले आहे. ते म्हणतात, "संत संप्रदायात चोखामेळा हा महार, सजन कसाई, गोरा कुंभार, नरहरी सोनार, सावता माळी, कबीर जुलेहा, सेना न्हावी या शुद्रातिशूद्र जातींच्या संतांबरोबरच एकनाथ ही वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण घराण्यातील व्यक्तीदेखील आहे. समाज बहिष्कृत केल्या गेलेल्या व ब्राह्मणांनी प्रचंड छळलेल्या ज्ञानेश्वर व त्यांच्या भावंडांना या संप्रदायाने नुसते सामावूनच घेतले नाही तर प्रतिष्ठेचे स्थान देखील दिलेले दिसते."[1] सदर विधानात संतांच्या मंदियाळीतील समता, एकता, एकनिष्ठता मानवता या मूल्यांची रुजवण कशी झाली आहे याकडे लक्ष वेधले आहे.

बाराव्या शतकात कर्नाटक राज्यात तत्कालीन समाज व्यवस्थेच्या विरोधात विद्रोह करणारे संत बसवेश्वर लक्षात घेण्यासारखे आहेत. यांचा जन्म सनातनी हिंदू धर्मीय घराण्यात झालेला आहे; तरी देखील त्यांनी हिंदु धर्मातील तत्कालीन सामाजिक आणि धार्मिक वर्णव्यवस्थेला प्रचंड विरोध केलेला दिसतो. धर्म ही केवळ काही लोकांची मक्तेदारी होती. अस्पृश्य, शूद्र, स्त्री यांना शिक्षणापासून वंचित

ठेवण्यात आले होते. जनावरांपेक्षाही हीन अशी खालच्या दर्जाची वागणूक अस्पृश्य आणि शूद्रांना देण्यात येत होती. कर्मकाडांचे स्तोम माजले होते. यज्ञामध्ये निष्पाप जनावरांना बळी देण्यात येत असे. या व्यवस्थेवर बसवेश्वर यांनी कडाडून प्रहार केलेला दिसतो. बसवेश्वरांनी होम, हवन, यज्ञ, अग्निपूजा निषिद्ध मानली आहे. या गोष्टींना सक्रिय विरोध केलेला आहे. संत बसवेश्वरबाबतीत गौतम निकम म्हणतात, "बसवेश्वरांनी स्व-पूजेला म्हणजे स्वत: करावयाच्या पूजेला महत्त्व दिलेले आहे. पूजाऱ्यांकरवीची भाडोत्री पूजा म्हणजे इतरांकरवी केली जाणारी पूजा बसवेश्वरांना मान्य नव्हती. वेद प्रामाण्यतेपेक्षा अनुभव प्रामाण्यता श्रेष्ठ आणि आवश्यक असल्याचा निर्वाळा त्यांनी दिलेला आहे. देव मानणे आणि त्यावर श्रद्धा ठेवून काही विधिवर्तन करणे त्यांनी चुकीचे व विसंगत मानलेले आहे."[2] बसवेश्वर हे किती बुद्धीप्रामाण्य व पुरोगामी विचारांचे संत होते हे अभिव्यक्त होताना दिसते.

संत साहित्य ही काळाची गरज आहे हे लक्षात घेतले पाहिजे. आजही समाजात अंधश्रद्धा, पाखंड व बुवाबाजी आढळते. धर्माचा व्यापार करण्याची प्रवृत्ती आढळते.धर्माच्या नावावर जगण्याची प्रवृत्ती सर्वत्र आढळताना दिसते. बुवाबाजी, टिळेटोप धारण करून समाजाला फसवणं 'गुरु' बाजीचा बडिमार माजवणं, कर्मकांडात समाजाला गुंतवून ठेवणं, व्रतवैकल्यांच्या चक्रव्यूहात समाजाला अडकवणं, नवससायास करणं यासारख्या कितीतरी गोष्टींवर संतांनी कठोर प्रहार आणि विद्रोह केलेला दिसतो. डॉ. यु. म. पठाण म्हणतात, "संत साहित्याचा संचार मात्र समाजाच्या कानाकोपऱ्यापर्यंत असतो. त्यामुळे शहरांप्रमाणेच खेडोपाडी, वस्त्यांवस्त्यांत ते आपले हे संस्कार उमटवू शकतं आणि म्हणूनही संत साहित्य ही आजच्या काळाची गरज आहे."[3]

समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ह्या मूलभूत तत्त्वावर आधारीत कबीर काव्य कबीरांनी लोकसमाजापुढे मांडले. बहिष्कृत दलित समाज याकडे विशेष आकर्षिला गेला, ऐकू लागला व कबीर गाऊ लागले. आजही कबीरांचे काव्य कानावर पडले की सर्वसामान्य माणूस आकर्षित होताना दिसतो. कबीरांनी वेद आणि पुराणाला मानण्यास स्पष्ट नकार दिला आहे. जी गोष्ट मानव उपयोगी नाही अशा त्रिदेव ईश्वराला सुद्धा त्यांनी वाळीत टाकलेले दिसते. कबीर तर्कवादी होते. अनुमान प्रमाण आणि प्रत्यक्ष प्रमाण यावर कबीरांनी सुद्धा सर्वाधिक भर दिलेला दिसतो. त्यांनी बुद्ध जीवनमूल्य स्वीकारलेले दिसते.

पोथी पढी जग मुआ, पंडित भयान कोय।
ढाई आखर प्रेम कर, पढे सू पंडित होय।।
सुटक तरीकत जानीये, हिंदू वेद पुराण।
मन समझावणं कारणे कछु यक पढिये ज्ञान।।

वेद आणि पुराणात संत शब्दाचा उल्लेख नाही. संत, साधू, सत्संग, साधो आदी शब्दांचा प्रयोग बौद्धाच्या पाली भाषेत वारंवार आढळून येतो. बुद्ध विचारांच्या संत संगतीतून, संत सत्संग हे शब्द पुढे आलेले दिसतात. यामुळेच मराठी संत साहित्यावर आणि हिंदी संतसाहित्यावर बौद्ध धर्माचा प्रभाव विशेष करून जाणवतो.

संत रविदास यांनीही आपल्या साहित्य विचारातून समतावादी विचार मांडले आहेत. "रविदास उपजिह सभ बुंद ते का ब्राह्मण का सुदा मूरीख जन न जनाई सभ मह राम मजूदा। अर्थात सर्व जगच एका बिंदुपासून निर्माण झाले आहे त्यामुळे यात कोण ब्राह्मण, कोण शूद्र? सर्वांमध्ये तो राम बसलेला आहे. असा या कवनांचा भावार्थ लक्षात घेण्यासारखा आहे. संत रविदास आणखी म्हणतात, 'चामको हम भी चाम के तूम भी, चामके है जग सारा, चाम बिगर कौन है, जी कही रविदास चमार' असे ते सहजन सांगून जातात. सर्व जगच चामड्यांनी व्यापले आहे. त्यामुळे येथे सर्व समान आहेत असा आधुनिक विचार ते मांडतांना दिसतात.

संत चोखोबाच्या स्पर्शाने उच्चवर्णीयांना, सवर्णांना विटाळ होत असे. अशा विटाळ-चांडाळावर, सोवळे-ओवळ्यांवर आपल्या मूलग्राही, विद्रोही विचारांचा हल्ला संत चोखोबांनी केलेला आहे. संत चोखोबांवर चोरीचा सुद्धा आरोप केला गेला होता. तेव्हा विठ्ठलाला ते आळवतात.

धाव घाली विठू आता। चालू नको मंद।।
बडवे मज मारिती। ऐसा काही तरी अपराध।।

त्यांची अभंगवाणी ही त्यांच्या विनम्र, लीन, भक्तिनिष्ठ व्यक्तिमत्त्वाची द्योतक आहे. आणि म्हणून डॉ. फुला बागुल त्यांच्या रचनेबद्दल म्हणतात, "चोखामेळा यांची अभंगरचना, नाममहात्मापर, स्वजीवनदर्शनपर, पंढरपुर व विठ्ठल भक्तिपर, देवाशी प्रेमकलहपर, उपदेशपर अशी विविधांगी आहे. त्यांच्या अभंगवाणीत आर्तता आहे."[4] डॉ. बागुल यांनी संत चोखामेळा यांच्या अभंगाची प्रासादिकता सिद्ध केली आहे.

आत्मविश्वासाबरोबरच आत्कप्रकटीकरणातूनही समाजविकासाची दृष्टी म्हणजेच वर्णाश्रम धर्मव्यवस्थेतील सामाजिक विषमता नष्ट करण्याची दृष्टी, अस्पृश्यता नष्ट करण्याचा विचार, विटाळ-शिवाशिवी मानू नये, पाळू नये हा विचार मूलगामी, मोलाचा, ऐतिहासिक स्वरुपाच्या, दूरदृष्टीचा विचार चोखोबांनी आपल्या अभंगवाणीतून व्यक्त केला आहे. या संदर्भात शंकरराव खरात म्हणतात, "चोखोबांनी आपल्या अभंगवाणीतून तत्कालीन समाजातील दारिद्र्याचे, गरिबीचे नागडे-उघडे दर्शन घडविले आहे. दारिद्र्यामुळे समाजात एक वर्ग गरिबीत जीवन जगणारा आणि दुसरा सुखात चैनीत राहणारा असे दोन जाती वर्ण दिसतात. याचे भेदक वर्णन त्यांनी आपल्या साहित्यातून वास्तवतेने मांडले आहे."[5] खरात यांनी चोखोबा यांच्या अभंगवाणीतील मानवतावादी दृष्टिकोन सिद्ध केलेला दिसतो. अर्थात संत साहित्य हे अन्याय-अत्याचार, जातीय विषमता यावर प्रबोधन करणारे साहित्य म्हणून समाजसुधारणेत त्याचा मोठा वाटा आहे असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही.

**निष्कर्ष :-**

- समाजप्रबोधन आणि उद्बोधनात संतसाहित्याचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.
- संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, संत रविदास, संत तुकाराम, संत कबीर, संत चोखोबा, संत बसवेश्वर यांनी आपल्या साहित्यातून विद्रोह अभिव्यक्त केलेला आहे.
- अभंगवाणी आणि विचारातून जातीय विषमता, स्पृश्यअस्पृश्यता नष्ट करण्यासाठी संत साहित्याचे माध्यम प्रभावी ठरले आहे.

- संत साहित्य ही आदर्श संस्कृतीची विचारधारा आहे.
- संत तुकाराम, संत बसवेश्वर, संत कबीर, संत चोखोबा, संत रविदास यांनी आपल्या अभंगवाणीतून सामाजिक विद्रोह व्यक्त केलाय.
- संत साहित्यातील विद्रोहातून समतावादी भूमिका अभिव्यक्त झालेली दिसते.
- संत साहित्य हे अन्याय, अत्याचार, जातीय विषमता यावर प्रहार करणारे आहे.

**संदर्भ ग्रंथ:-**

1) गौतम निकम, ‘संतांचे सामाजिक व धार्मिक विद्रोह’ विमलकीर्ती प्रकाशन, चाळीसगाव, प्रथमावृत्ती, 2010, पृ. 26.
2) तत्रैव, पृ.क्र. 23.
3) डॉ. यु. म. पठाण, ‘संत साहित्य : पुनर्मूल्यांकन’, अनुपम प्रकाशन केंद्र, औरंगाबाद, प्रथमावृत्ती 1992, पृ. 11.
4) डॉ. फुला बागूल, ‘बहुजनातील संत कवी- कवयित्री’ अथर्व पब्लिकेशन, धुळे, प्रथमावृत्ती, 25 डिसेंबर 2014, पृ. 17.
5) शंकरराव खरात, ‘चोखोबाचा विद्रोह’, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 14 एप्रिल 2002, पृ. 40.

******